**पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**दिनांक १२/१०/२०१७ (गुरूवार)**
**(दुपार)**

---

## रस्त्यावर अडवुन मारहाणी तसेच लज्जास्पद कृत्यांबद्दल चारही आरोपीतांना एक वर्षाची सश्रम कारावासाची शिक्षा

प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी कि, फिर्यादी जखमी नामे– अंतकला दिलीप झामरे, वय 62 वर्ष, रा. सडेश्वर हि दिनांक 13/12/2015 ला सांयकाळी 07.30 वा. च्या दरम्यान सडेश्वर येथील आठवडी बाजार करून आपल्या घरी रस्त्याने एकटीच परत येत असता यातील आरोपी नामे – समीर गोडघाटे, वय 28 वर्ष, निखील गोडघाटे, वय 30 वर्ष, संकेत म्हैस्कर, वय 29 वर्ष व भालचंद्र कुंभारे, वय 32 वर्ष सर्व रा. सडेश्वर यांनी जखमी नामे– अंतकला दिलीप झामरे हिला अडवुन तिला लज्जास्पद बोलुन तिला मारहान केली व तिचे दात पाडले. त्यामुळे तिने पोलीस स्टेशन बेला येथे फिर्यादी पोलीस स्टेशन बेला यांनी चारही आरोपी विरूध्द अप.क्र. 77/2015 क. 341,325,509,34 भादवि अन्वये गुन्हा नोंद केला व तपास पुर्ण करून दोषारोप पत्र मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब, उमरेड यांच्या न्यायालयात दाखल केले. सदर आरोपीतांविरूध्द मा. ए. व्ही. पंडीत सा. सहदिवाणी न्यायाधिश तथा न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग उमरेड यांच्या न्यायालयात सदर प्रकरणाचा निवारण दिनांक 11/10/2017 रोजी पारीत करण्यात आला असुन सदर न्यायालयाने आरोपीतांना सदर खटल्यात दोषी ठरवुन चारही आरोपीतांना शिक्षा ठोठावण्यात आली आहे. अरोपीतांविरूध्द कलम 325 भादवि मध्ये एक वर्षे सश्रम कारावास व प्रत्येकी 5,000/– रू. दंड, कलम 509 भादवी मध्ये 01 वर्षे सश्रम कारावास व कलम 341 भादवि मध्ये एक महिण्यासाठी कारावासाची शिक्षा ठोठावली. आरोपींताना दंड झालेल्या रकमेपैकी जखमीस 15,000/– रू. देण्याचा आदेश न्यायालयाने वरील निकालात दिला.

सदर प्रकरणाचा तपास हवलदार– श्री. गणेश रॉय यांनी केला असुन सरकारी पक्षातर्फे देवेंद्र बोरस्कर, सहायक सरकारी अभियोक्ता उमरेड यांनी तर आरोपी तर्फे ॲड. खानोरकर यांनी बाजु मांडली तसेच या प्रकरणात सहायक पोलीस निरीक्षक श्री. विश्वास पुल्लरवार पोलीस स्टेशन बेला यांचा मार्गदर्शनात पोलीस नाईक श्री. भोजराज झाडे यांनी पेहरवी अधिकारी म्हणुन काम केले.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर